दिनांक ७ नोव्हेंबर हा दिवस सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक :- बैठक २०१७/प्र.क्र.१७३/समन्वय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४००.०३२**
**दिनांक :- ३ नोव्हेंबर, २०१७.**

<u>वाचा -:</u> शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - औचिमु-२५१६/ प्र.क्र.१४७/१७/एस.डी.४, दि. २७/१०/२०१७

**<u>प्रस्तावना :-</u>**

डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिनांक ७ नोव्हेंबर १९०० ,रोजी प्रतापसिंग हायस्कुल ,राजवाडा चौक, जि .सातारा येथे झाला .डॉ .बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन म्हणजे एका अर्थाने शैक्षणिक क्रांतीची व युगांतराची चाहूल म्हटली पाहिजे .कारण डॉ .बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळेच ते स्वत: सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे-वंचितांचे उध्दारकर्तेही झाले .त्यामुळेच ते आदर्श संविधानाचे शिल्पकारही ठरले .त्यामुळेच शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून आदर्श विद्यार्थी निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या कठोर परिश्रमांची जाण सर्व विद्यार्थ्यांना होण्यासाठी दिनांक ७ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने उपरोक्त दिनांक २७/१०/२०१७ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत .सदरहू विद्यार्थी दिवस राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यासंदर्भात मा. मंत्री ,सामाजिक न्याय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ ,रोजी संबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली होती .सदरहू बैठकीमध्ये मा. मंत्री ,सामाजिक न्याय यांनी दिनांक ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस साजरा करण्याच्या संदर्भात सुचना दिलेल्या आहेत.

**शासन परिपत्रक:-**

दिनांक ७ नोव्हेंबर हा दिवस राज्यात विद्यार्थी दिवस म्हणून मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१. विद्यार्थी दिवस या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलुंवर निबंध स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा , काव्यवाचन , इत्यादी उपक्रमांचे आयोजन करावे.

२. उपस्थित मान्यवर व निमंत्रितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पुस्तक तसेच पेन देवून स्वागत करावे.

३. कार्यक्रमात घटनेच्या सारनाम्याचे ( उद्देशिका ) जाहीर वाचन करावे.

४. उच्चशिक्षित माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करावा.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील छायाचित्रे, चित्रफीती / चित्रपट प्रदर्शित कराव्यात /दाखवाव्यात .

२. मा. मंत्री ,सामाजिक न्याय यांच्या उपरोक्त निर्देशांच्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शाळा व इतर शैक्षणिक संस्थांना, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालये , तंत्रनिकेतन व इतर शैक्षणिक संस्था , वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील वैद्यकीय महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्था, ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांना व इतर शैक्षणिक संस्था , नगर विकास विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील महानगरपालिका ,नगरपालिका व नगर परिषदांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांना व इतर शैक्षणिक संस्था, आदिवासी विकास विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अनुदानित आश्रमशाळांना व इतर शैक्षणिक संस्था , तसेच विमुक्त जाती ,भटक्या जमाती ,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील अनुदानित आश्रमशाळांना व इतर शैक्षणिक संस्था यांना तसेच अन्य प्रशासकीय विभागांनी ही त्याच्या अधिनस्त शैक्षणिक संस्था यांना उपरोक्त निर्देशांचे पालन करण्याबाबत आपल्या विभागाच्या अखत्यारीतीतील क्षेत्रिय कार्यालयांना/ संबंधितांना आपल्या स्तरावर सूचना द्याव्यात .

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, अपंगांच्या शासकीय व अनुदानित विशेष शाळा व कर्मशाळा व इतर शैक्षणिक संस्थांनी उपरोक्त निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत आयुक्त ,समाजकल्याण ,महाराष्ट्र राज्य ,पुणे व आयुक्त ,अपंग कल्याण , महाराष्ट्र राज्य ,पुणे यांनी सर्व संबंधितांना तसे निर्देश देण्यात यावेत. तसेच, सदर बाबींवर होणारा खर्च

त्यांना उपलब्ध असलेल्या तरतूदीतुन करण्यात यावा, यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७११०३१६५९३३३०२२ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2017.11.03 16:50:09 +05'30'

(सि.अ. झाल्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -:

१. मा. राज्यपाल यांचे सचिव ,महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय ,मुंबई.
३. मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री , सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,
५. मा. मुख्य सचिव ,महाराष्ट्र शासन ,मंत्रालय ,मुंबई.
६. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव ,सर्व मंत्रालयीन विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
७. सर्व विभागीय आयुक्त
८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा अनुज्ञेयता / लेखापरिक्षा ) महाराष्ट्र राज्य , मुंबई/नागपूर.
९. आयुक्त, समाजकल्याण ,महाराष्ट्र राज्य ,पुणे.
१०.आयुक्त, अपंग कल्याण ,महाराष्ट्र राज्य ,पुणे.
११.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१२.सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
१३.निवडनस्ती /समन्वय